**शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया ची मासिक सभा दिनांक ०८/१२/२०१७ चे कार्यवृत्त**

| सभेची तारीख | उपस्थित सदस्याची नांवे | उपस्थित अधिका-यांची नांवे | संक्षिप्त अहवाल |
|---|---|---|---|
| **०८/१२/२०१७** | हजेरी रजिस्टर प्रमाणे | हजेरी रजिस्टर प्रमाणे | खाली नमुद प्रमाणे |

दिनांक ०८.१२.२०१७ ला दुपारी ठिक १.०० वाजता शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया ची मासिक सभा मा. श्री पी.जी.कटरे, सभापती, शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली तसेच सभेचे कामकाज चालविण्याकरिता मा. सभापती, शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे कक्षात सभा आयोजित करण्यांत आली होती. श्री यु.के.नरड, शिक्षणाधिकारी (प्राथ) यांनी सन्मा. सभापती, सन्मा. सदस्य व सभेमध्ये उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजाला सुरवात करण्यांत आली.

**विषय -०१ :- मागील सभेचे कार्यवृत्त वाचन करुन कायम करणे.**

**ठराव :-** मागील सभेतील कार्यवृत्ताचे वाचन श्री यु.के.नरड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी केले. त्यावर सभागृहात चर्चा होवून मागील सभा दिनांक दिनांक १०.११.२०१७ मासिक सभेतील विषय क्रं. १, २ तसेच मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने वेळेवर येणार अतिरिक्त विषय क्रं. ३/१, ३/२, ३/३, ३/४, ३/५, ३/७, ३/८, ३/९, ३/१०, ३/११, ३/१२, ३/१३, ३/१४, ३/१५, ३/१६कायम करण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ०२ :- प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राबाबत आढावा.**

**ठराव :-** शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत आजच्या सभेमध्ये तालुकानिहाय प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राबाबत गटशिक्षणाधिकारी यांनी आढावा सादर केला.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राबाबत गट शिक्षणाधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये १००% शाळा डिजिटल झालेल्या असून सर्व वर्ग सुध्दा डिजिटल करणेसाठी तसेच १००% विद्यार्थी प्रगत करणेसाठी नियोजनबध्द कार्यवाही करण्याचे निर्देश मा. सभाध्यक्षांनी दिले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं.३ :- मा. अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.**

सन्माननिय, सभापती, शिक्षण व क्रिडा समिती तसेच आरोग्य समिती, जिल्हा परिषद, गोंदिया तथा सन्माननिय सदस्यांनी समितीच्या सभेत खालील विषयावर पुढील सभेत चर्चा करण्याचे सूचविले.

**विषय क्रं. ३/६ :- ग्रामीण भागातील क्रिडासत्राचे आयोजना करिता संभाव्य अंदाजपत्रक (१०१/३३) रुपये १५.०० लक्ष खर्च करण्याची मंजुरी देण्याबाबद.**

**ठराव :-** स्वदेशी खेळोत्तेजक मंडळाचे सन २०१७-१८ ग्रामीण भागातील क्रिडासत्राचे आयोजना करिता रु. १५.०० लक्ष जिल्हा निधी संभाव्य अंदाजपत्रकात मंजूर आहे. जिल्हानिधी ३-शिक्षण (चार) जि. प. ने स्वतःच्या उत्पादनाची साधने यातुन घ्यावयाची योजना व कामे अनुक्रमांक १०१-३३ मध्ये सन २०१७-१८ या वर्षा करिता रु. १५.०० लक्ष रुपये प्राप्त अनुदान मधुन केंद्र, तालुका व जिल्हा जिल्हा स्तरावर क्रिडासत्राचे कार्यक्रम घेण्याकरिता रु. १५.०० खर्च करण्याची परवानगी प्रदान करण्यांत येत असून रु. १५.०० चे केंद्र, तालुका व जिल्हा जिल्हा स्तरावर क्रिडासत्राचे कार्यक्रम घेण्याकरीता खर्चाचे नियोजन करण्यासाठी पुढील सभेत चर्चा करण्याचे सर्वानुमते ठरविण्यांत आले होते.

सदर विषयावर आजच्या सभेत चर्चा होउुनसन २०१७-१८ या वर्षा करिता रु. १५.०० लक्ष रुपये प्राप्त अनुदान मधुन केंद्र, तालुका व जिल्हा स्तरावर क्रिडासत्राचे कार्यक्रम घेण्याकरिता खालील प्रमाणे नियोजन करण्यांत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| प्रति केंद्र रु. ८०००/- प्रमाणे | ८२x८००० | ६५६०००/- |
| प्रति तालुका रु. ५००००/- | ८x५०००० | ४०००००/- |
| जिल्हास्तरावर | -- | ३९४०००/- |
| अपघात झाल्यास राखीव निधी | -- | ५००००/- |
| **एकूण -** | | **१५०००००/-** |

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/१ :-सन २०१६-१७ मधील ग्रामीण भागातील क्रिडासत्राचे आयोजना अपघाताकरीता रुपये ५०,०००/- राखीव निधी स्वदेशी खेळोत्तेजक मंडाळाला परत करण्याबाबत.**

**ठराव :-** स्वदेशी खेळोत्तेजक मंडळाचे सन २०१६-१७मधील ग्रामीण भागातील क्रिडासत्राचे एकूण अंदाजपत्रकाचे नियोजन करतांना अपघात झाल्यास रु. ५०,०००/- निधी राखीव ठेवण्यांत आले होते. परंतु सदर वर्षात कुठलाही अपघात झालेला नसून निधी अखर्चित असल्याने रु. ५०,०००/- स्वदेशी खेळोत्तेजक मंडळाला परत करण्याबाबत सन्मा. सभापती महोदयांनी निर्देश दिले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/२:-जिल्हा क्रीडा विभागामार्फत शाळांना साहित्य देण्याचे अधिकार शाळा व्यवस्थापन समितींना देण्याबाबत.**

**ठराव :-** जिल्हा क्रीडा विभागामार्फत शाळांना साहित्य देण्यांत येतात. परंतु सदर साहित्य शाळेच्या आवश्यकतेनुसार उपलब्ध होत नसल्यामूळे साहित्य देण्याचे अधिकार शाळा व्यवस्थापन समितींना देण्याबाबत सन्मा. जि.प.सदस्या सौ. माधुरीताई पातोडे यांनी सूचविले.

यावर आजच्या सभेमध्ये चर्चा होवून याबाबत जिल्हा क्रीडा विभागाला कार्यवाही करणेस कळविण्याचे सन्मा. सभापती महोदयांनी सूचविले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/३:-जिल्हा परिषद हॉयस्कूलवर कार्यरत घडयाळी तासिका शिक्षकांचे मानधन वाढविणेबाबत.**

**ठराव :-** जिल्हा परिषद हॉयस्कूल वर कार्यरत असलेले घडयाळी तासिका शिक्षकांना अध्यापन कार्य करण्यासाठी प्रतितास रु. ७२/- प्रमाणे देय आहे. घडयाळी तासिका शिक्षकांची शैक्षणिक पात्रता व अध्यापन कार्याचा विचार केल्यास मजूरी पेक्षाही कमी मानधन मिळत असल्यामूळे घडयाळी तासिका शिक्षकांचे मानधनात वाढ करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्याचे सन्मा. सभापती महोदयांनी सूचविले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/४:-शालेय पोषण आहार योजनेंतर्गत स्वयंपाकी मदतनिसांचे मानधनात वाढ करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्याबाबत.**

**ठराव :-** शालेय पोषण आहार योजनेंतर्गत शाळा स्तरावर २५ विद्यार्थ्याच्या मागे कार्यरत एक स्वयंपाकी मदतनिस यांना प्रति महिना रु. १०००/- मानधन देय आहे. सध्याच्या महागाईच्या काळात त्यांना अंत्यत कमी मानधन मिळत असल्याने कौटुंबिक गरजा पूर्ण करणे अडचणीचे होत आहे. त्यामूळे आजच्या सभेमध्ये चर्चा होवून स्वयंपाकी मदतनिसाचे मानधन वाढविण्याबाबत शासनास पाठपुरावा करण्याबाबत सन्मा. सभापती महोदयांनी सूचविले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/५:-जिल्हा परिषद शाळांचे १००% स्कॉऊट गाईड होणेकरीता नोंदणी करणेबाबत.**

**ठराव :-** सर्व जिल्हा परिषद शाळांची नोंदणी स्काऊट व गाईड तसेच कब-बुलबुल यामध्ये करण्याची कार्यवाही गट शिक्षणाधिकारी यांनी आपले स्तरावरुन करण्याचे निर्देश मा. सभापती महोदयांनी सूचविले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/६ :-जिल्हानिधी सन २०१७-१८ अंतर्गत शिक्षण सेवक भरती, संगणक देखभाल दुरुस्ती, ई-लर्निंग साप्टवेअर खरेदी करणे तसेच विद्यार्थ्यांना ओळखपत्र पुरविणे करीता एकूण रु. १३.५० लक्ष ची तरतुद मंजूर असून सदर निधी या आर्थिक वर्षात खर्च होणार नसल्याने**

**सदर निधी जि.प.प्राथमिक शाळांतील शाळा गृह कंपाऊंड वाल बांधकाम दुरुस्ती करीता वळती करण्याची मंजूरी प्रदान करणेबाबत.**

**ठराव :-** जिल्हानिधी सन २०१७-१८ मध्ये खालील बाबींवर अनुदान मंजूर असून सदर मंजूर निधी या आर्थिक वर्षात खर्च होणार नसल्याने सदरील निधी लेखाशिर्ष १०१-२७ शाळा कंपाऊंड वाल बांधकाम दुरुस्ती करीता वळती करण्याबाबत मा. सभापती महोदय यांनी विनंती केली.

| अ.क्रं. | लेखाशिर्ष | बाब | मंजूर अनुदान | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | १०१-१३/१ | शिक्षण सेवक भरतीसाठी लागणारा कार्यालयीन खर्च | १.५० | |
| २. | १०१-१७ | संगणक देखभाल दुरुस्ती व संगणक व प्रिंटर खरेदी | ५.०० | |
| ३. | १०१-१९/४ | ई-लर्निंग, सॉफ्टवेअर खरेदी करणे | ५.०० | |
| ४. | १०१-१९/९ | विद्यार्थ्यांना ओळखपत्र पुरविणे | २.०० | |
| | | **एकूण-** | **१३.५०** | |

सदर विषयावर साधक बाधक चर्चा होऊन उपरोक्त प्रमाणे शिक्षण सेवक भरती, संगणक देखभाल दुरुस्ती, ई-लर्निंग साप्टवेअर खरेदी करणे तसेच विद्यार्थ्यांना ओळखपत्र पुरविणे करीता एकूण रु. १३.५० लक्ष चीतरतुद मंजूर सदर निधी सन २०१७-१८ मध्ये खर्च होणार नसल्याने लेखाशिर्ष १०१-२७ शाळा कंपाऊंड वाल बांधकाम दुरुस्ती करीता वळती करण्याबाबत मंजुरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं.३/७ :- सत्र २०१८ वर्षात सार्वजनिक सुट्टीचे नियोजनाबाबत.**

**ठराव :-** महाराष्ट्र शासन,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रं. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२०६/एसडी-२ मंत्रालय मुंबई दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ नुसार राज्यातील धार्मिक सण व उत्सव इ. च्या कालावधीमध्ये परीक्षा घेणे व शाळांना सुटयांच्या नियोजनाबाबत चर्चा करुन परिपत्रक काढण्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सूचविले.

त्यानुषंगाने आजच्या सभेमध्ये वरिल शासन निकषाच्या अधिन राहून सार्वजनिक सुट्ट्या २३, मा. जिल्हाधिकारी गोंदिया व्दारा घोषीत सुट्ट्या ०३, स्थानिक सुट्ट्या ०३, मुख्याध्यापक अधिकारात सुट्ट्या ०१, दिवाळी सुट्ट्या ०९, तसेच उन्हाळयातील सुट्ट्या ३६असे एकूण ७६ सुटयां देण्यांत यावे. विदर्भात उन्हाचे तिव्रता जास्त असल्याने जिल्हा गोंदियातील सर्व प्राथमिक शाळा हे २६ जुन २०१८ पासुन सुरु करण्यात यावे तसेच दिवाळीच्या सुट्ट्या हे ५.११.२०१८ पासुन १९.११.२०१८ पर्यत म्हणजेच २१.११.२०१८ ला शाळा सुरु करण्यात यावे असे ठरविण्यांत आले.

**वरिल प्रमाणे सुट्ट्या लक्षात घेता अंतिम सुट्टयाचे परिपत्रक खालील प्रमाणे मंजुर करण्यात येते.**

| अ.क्रं. | सुट्ट्या | दिवस | विवरण |
|---|---|---|---|
| १ | सार्वजनीक सुट्ट्या २०१८ | २३ | यादि सोबत जोडली आहे. |
| २ | मा.जिल्हाधिकारी गोंदिया व्दारा घोषीत सुट्ट्या | ०३ | मा.जिल्हाधिकारी गोंदिया यांनी घोषीत केल्याप्रमाणे राहतील. |
| ३ | स्थानिक सुट्ट्या | ०३ | यादि सोबत जोडली आहे. |
| ४ | मुख्याध्यापकाच्या अधिकारातील सुट्ट्या | ०१ | विशेष निमित्ताने पुर्वपरवानगीने देण्यांत यावी. |
| ५ | उन्हाळयातील सुट्ट्या<br>(शासकिय सुट्ट्या वगळुन) | ३६ | १४.०५.२०१८ ते २५.०६.२०१८ पर्यंत.<br>दिनांक २६.०६.२०१८ पासून शाळा नियमित सुरु होतील. |
| ६ | दिवाळी सुट्ट्या (शासकिय सुट्ट्या वगळुन) | १० | ५.११.२०१७ ते १९.११.२०१८ पर्यत.<br>दिनांक २१.११.२०१८ पासून शाळा नियमित सुरु होतील. |
| | **एकुण सुट्ट्या** | **७६** | |

**सार्वजनिक सुट्टया**

| अ.क्रं. | सुट्टीचे दिवस | दिनांक | वार |
|---|---|---|---|
| १ | प्रजासत्ताक दिन | २६ जानेवारी, २०१८ | शुक्रवार |
| २ | महाशिवरात्री | १३ फेब्रुवारी, २०१८ | मंगळवार |
| ३ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी, २०१८ | सोमवार |
| ४ | होळी (दुसरा दिवस) | ०२ मार्च, २०१८ | शुक्रवार |
| ५ | महावीर जयंती | २९ मार्च, २०१८ | गुरुवार |
| ६ | गुडफ्रायडे | ३० मार्च, २०१८ | शुक्रवार |
| ७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल, २०१८ | शनिवार |
| ८ | बुध्द पोर्णीमा | ३० एप्रिल, २०१८ | सोमवार |
| ९ | महाराष्ट्र दिन | ०१ मे, २०१८ | मंगळवार |
| १० | रमझानईद (ईद-उल फितर) | १६ जून, २०१८ | शनिवार |
| ११ | स्वातंत्र दिन | १५ ऑगष्ट, २०१८ | बुधवार |
| १२ | पारषी नववर्षे दिन (शहेनशाही) | १७ ऑगष्ट, २०१८ | शुक्रवार |
| १३ | बकरीईद (ईद-उल-झुआ) | २२ ऑगष्ट, २०१७ | बुधवार |
| १४ | गणेश चर्तुर्थी | १३ सप्टेंबर, २०१८ | गुरुवार |
| १५ | मोहरम | २० सप्टेंबर, २०१८ | गुरुवार |
| १६ | महात्मा गांधी जयंती | २ ऑक्टोबर, २०१८ | मंगळवार |
| १७ | दसरा | १८ ऑक्टोबर, २०१८ | गुरुवार |
| १८ | दिवाळी अमावस्या (लक्ष्मीपूजन) | ७ नोव्हेंबर, २०१८ | बुधवार |
| १९ | दिवाळी (बलीप्रतिपदा) | ८ नोव्हेंबर, २०१८ | गुरुवार |
| २० | भाऊबीज | ९ नोव्हेंबर, २०१८ | शुक्रवार |
| २१ | ईद-ए-मिलाद | २१ नोव्हेंबर, २०१८ | बुधवार |
| २२ | गुरुनानक जयंती | २३ नोव्हेंबर, २०१८ | शुक्रवार |
| २३ | ख्रिसमस | २५ डिसेंबर, २०१८ | मंगळवार |

**मा.जिल्हाधिकारी.गोंदिया यांच्या कडुन घोषीत सुट्टया**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

**स्थानिक सुट्टया**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | गोपालकाला | ०३ सप्टेंबर, २०१८ | सोमवार |
| २ | तान्हापोळा (दुसरा दिवस) | १० सप्टेंबर, २०१८ | सोमवार |
| ३ | घटस्थापना | १० ऑक्टोबर, २०१८ | बुधवार |

मुख्याध्यापकाच्या अधिकारातील १ सुट्टी ठेवली असुन विषेश निमित्याने परंतु वर्षारंभी नियोजन करुन ही सुट्टी गटशिक्षणाधिकारी यांची पुर्वपरवानगी घेवुन देण्यात यावी सार्वजनिक, स्थानिक, उन्हाळयाच्या व दिवाळी च्या सुट्टया इत्यादी निश्चीत केल्या प्रमाणे वरिल प्रमाणे परिपत्रकानुसार राहतील असे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/८ :-जिल्हा वार्षिक योजना, (अनुसूचित जाती उपयोजना) सन २०१७-१८ अंतर्गत अनुसूचित जातीच्या मुलींना मोफत सायकल पुरणेबाबत.**

**ठराव :-** जिल्हा वार्षिक योजना, (अनुसूचित जाती उपयोना) सन २०१७-१८ अंतर्गत अनुसूचित जातीच्या मुंलीना मोफत सायकल पुरविणेबाबत सीआरसी कोड N-०६, २२२५E७०३, बाब-३१, लेखाशिर्ष NE०८०००३

मध्ये एकूण ५०.०० लक्ष अर्थसंकल्पिय निधी मंजूर असून मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, गोंदिया यांचे निधी वितरण आदेश क्रं. २६७०/२०१७ दिनांक ११.१२.२०१७ नुसार रु. ३५.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रं. डिसीटी२३१६/ प्र.क्र.१३३/ का. १४१७, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक ५ डिसेंबर, २०१६ नुसार **'**विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तुस्वरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बॅंक खात्यात करणेबाबत**'** आदेशीत आहे. साधनसामुग्रीच्या यादीमध्ये अ.क्रं.९ वर सायकल वाटप या योजनेचा समावेश आहे. जिल्हा परिषद व्यवस्थापनेच्या शाळेतील वर्ग ५ ते १२ मध्ये शिकणा-या व शाळेपासून २ ते ५ मि.मी.अंतरावरुन येणे-जाणे करणा-या अनुसूचित जातीच्या मुलींना या अगोदर इतर योजनेतुन लाभ मिळालेला नाही या खात्री करुन तसेच मानव विकास विभागाच्या धर्तीवर प्रती लाभार्थीरु. ३,०००- (रुपये- तीन हजार) प्रमाणे मोफत सायकल खरेदी करणेसाठी अनुदान वितरीत करण्यांत येईल याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सभेत विनंती केली.

त्यावर आजच्या सभेमध्ये जिल्हा वार्षिक योजना, (अनुसूचित जाती उपयोजना) सन २०१७-१८ मध्ये अनुसूचित जातीच्या मुलींना मोफत सायकल पुरविणेकरीता प्राप्त निधी खर्च करण्याची व शासन निकषाच्या अधीन राहून जिल्हा परिषद व्यवस्थापनेच्या इयत्ता ५ ते १२ मध्ये शिकणा-या अनुसूचित जातींच्या मुलींना सायकल पुरविणेबाबत मंजूरी प्रदान करण्यांत येत असल्याचे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/९ :-जिल्हानिधी सन २०१७-१८ मध्ये लेखाशिर्ष १०१-२७ शाळा गृह कंपाऊंड वाल बांधकाम दुरुस्ती करीता रु. २०.०० लक्ष अनुदान खर्च करुन कामांच्या यादीस मान्यता प्रदान करणेबाबत.**

**ठराव :-** जिल्हानिधी सन २०१७-१८ मध्ये लेखाशिर्ष १०१-२७ शाळा गृह कंपाऊंड वाल बांधकाम दुरुस्ती करीता रु. २०.०० लक्ष अनुदान मंजूर आहे. सदर मंजूर अनुदान खर्च करण्याचे व खालील प्रमाणे जि.प.शाळा गृह कंपाऊंड वाल दुरुस्ती यादीला मंजुरी प्रदान करणेसाठी सन्मा. सभापती महोदयांनी सूचविले.

| अ.क्रं. | पं.स. चे नांव | जि.प.शाळेचे नांव | दुरुस्तीची किंमत (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| | | **शाळा गृह कंपाऊंडवाल बांधकाम दुरुस्ती (लेखाशिर्ष १०१-२७)** | |
| १. | आमगांव | जि.प.प्राथ.शाळा, भजेपारटोला येथे आवार भिंत दुरुस्ती | ३.०० |
| २. | आमगांव | जि.प.प्राथ.शाळा, नवेगांव (हनुमानटोली) येथे आवार भिंत दुरुस्ती | ३.०० |
| ३. | गोरेगांव | जि.प.प्राथ.शाळा, संलगटोला (चिल्हाटी)येथे आवार भिंत दुरुस्ती | ३.०० |
| ४. | गोरेगांव | जि.प.प्राथ.शाळा, तुमखेडा बु. येथे आवार भिंत दुरुस्ती | २.०० |
| ५. | गोरेगांव | जि.प.प्राथ.शाळा, बोरीटोला येथे आवार भिंत दुरुस्ती | २.०० |
| ६. | गोरेगांव | जि.प.प्राथ.शाळा, सर्वाटोला येथे आवार भिंत दुरुस्ती | २.५० |
| ७. | गोरेगांव | जि.प.प्राथ.शाळा, मोहगांव बु. येथे आवार भिंत दुरुस्ती | २.५० |
| ८. | गोरेगांव | जि.प.प्राथ.शाळा, दवडीपार येथे आवार भिंत दुरुस्ती | २.०० |
| | | **एकूण** | **२०.००** |

सदर विषयावर साधक बाधक चर्चा होऊन उपरोक्त प्रमाणे जि.प.शाळा गृह कंपाऊंड वाल दुरुस्ती खर्चास व यादीला आजच्या सभेत मंजुरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/१० :-जिल्हानिधी सन २०१७-१८ मध्ये लेखाशिर्ष १०१-५१ प्राथमिक शाळेची दुरुस्ती करीता रु. ५.०० लक्ष अनुदान खर्च करुन कामांच्या यादीस मान्यता प्रदान करणेबाबत.**

**ठराव :-** जिल्हानिधी सन २०१७-१८ मध्ये लेखाशिर्ष १०१-५१ प्राथमिक शाळेची दुरुस्ती करीता रु. ५.०० लक्ष अनुदान मंजूर आहे. सदर मंजूर अनुदान खर्च करण्याचे व खालील प्रमाणे प्राथमिक शाळेची दुरुस्ती यादीला मंजुरी प्रदान करणेसाठी सन्मा. सभापती महोदयांनी सूचविले.

| अ. क्रं. | पं.स. चे नांव | जि.प.शाळेचे नांव | दुरुस्तीची किंमत (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| | | **प्राथमिक शाळेची दुरुस्ती (लेखाशिर्ष १०१-५१)** | |
| १. | आमगांव | जि.प.प्राथ.शाळा, ननसरी येथे दुरुस्ती | २.१० |
| २. | आमगांव | जि.प.प्राथ.शाळा, बंजारीटोला येथे दुरुस्ती | २.९० |
| | | **एकूण** | **५.००** |

सदर विषयावर साधक बाधक चर्चा होऊन उपरोक्त प्रमाणे प्राथमिक शाळेची दुरुस्ती खर्चास व यादीला आजच्या सभेत मंजुरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/११ :-जिल्हानिधी सन २०१७-१८ मध्ये लेखाशिर्ष १०२-२७/१ माध्यमिक शाळा बांधकाम करीता रु. २०.०० लक्ष लक्ष अनुदान खर्च करुन कामांच्या यादीस मान्यता प्रदान करणेबाबत.**

**ठराव :-** जिल्हानिधी सन २०१७-१८ मध्ये लेखाशिर्ष १०२-२७/१ माध्यमिक शाळा बांधकाम करीता रु. २०.०० लक्ष अनुदान मंजूर आहे. सदर मंजूर अनुदान खर्च करण्याचे व खालील प्रमाणे जि.प. माध्यमिक शाळा बांधकाम यादीला मंजुरी प्रदान करणेसाठी सन्मा. सभापती महोदयांनी सूचविले.

| अ.क्रं. | पं.स. चे नांव | जि.प.शाळेचे नांव | दुरुस्तीची किंमत (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| | | **माध्यमिक शाळा बांधकाम (लेखाशिर्ष १०२-२७/१)** | |
| १. | सालेकसा | जि.प.हॉयस्कूल, साखरीटोला येथे नविन वर्गखोली बांधकाम | ९.७८ |
| २. | सालेकसा | जि.प.हॉयस्कूल, कावराबांध येथे नविन वर्गखोली बांधकाम | ९.७८ |
| | | **एकुण** | **१९.५६** |

सदर विषयावर साधक बाधक चर्चा होऊन उपरोक्त प्रमाणे जि.प.शाळा माध्यमिक शाळा बांधकाम खर्चास व यादीला आजच्या सभेत मंजुरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/१२ :-जिल्हानिधी सन २०१७-१८ मध्ये लेखाशिर्ष १०२-२७/२ माध्यमिक शाळा दुरुस्ती करीता रु. २०.०० लक्ष अनुदान खर्च करुन कामांच्या यादीस मान्यता प्रदान करणेबाबत.**

**ठराव :-** जिल्हानिधी सन २०१७-१८ मध्ये लेखाशिर्ष १०२-२७/२ माध्यमिक शाळा दुरुस्ती करीता रु. २०.०० लक्ष लक्ष अनुदान मंजूर आहे. सदर मंजूर अनुदान खर्च करण्याचे व खालील प्रमाणे जि.प. माध्यमिक शाळा दुरुस्ती यादीला मंजुरी प्रदान करणेसाठी सन्मा. सभापती महोदयांनी सूचविले.

| अ.क्रं. | पं.स. चे नांव | जि.प.शाळेचे नांव | दुरुस्तीची किंमत (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| | | **माध्यमिक शाळा दुरुस्ती (१०२-२७/२)** | |
| १. | तिरोडा | जि.प.हॉयस्कूल, वडेगांव येथे दुरुस्ती. | ६.०० |
| २. | तिरोडा | जि.प.हॉयस्कूल, गांगला येथे दुरुस्ती. | ५.०० |
| ३. | गोंदिया | जि.प.हॉयस्कूल, काटी येथे दुरुस्ती. | ४.०० |
| ४. | गोंदिया | जि.प.हॉयस्कूल, बनाथर येथे दुरुस्ती. | २.०० |
| ५. | गोरेगांव | जि.प.हॉयस्कूल, गोरेगांव येथे दुरुस्ती. | ३.०० |
| | | **एकुण** | **२०.००** |

सदर विषयावर साधक बाधक चर्चा होऊन उपरोक्त प्रमाणे जि.प.शाळा माध्यमिक शाळा दुरुस्ती खर्चास व यादीला आजच्या सभेत मंजुरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. ०४ : शिक्षण व क्रिडा समिती सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करणे.**

**ठराव क्र. ०४: शिक्षण व क्रिडा समिती सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करण्यात आले.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

यानंतर सभागृहासमोर विषय नसल्यामुळे सर्व सन्मा. सभापती,  सन्मा. सर्व सदस्य यांनी आजच्या सभेला उपस्थित राहुन आजच्या सभेचे कामकाज चालविण्यास सहकार्य केले त्या बद्दल श्री. यु.के.नरड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी उपस्थित सर्वाचे आभार व्यक्त केले व मा. अध्यक्षाच्या परवानगीने आजची सभा संपल्याचे जाहिर केले.

| | |
|---|---|
| **स्वा/-** | **स्वा/-** |
| सचिव,तथा | अध्यक्ष |
| शिक्षणाधिकारी (प्राथ) | शिक्षण व क्रिडा समिती, |
| जिल्हा परिषद, गोंदिया. | जिल्हा परिषद, गोंदिया. |

**शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया ची मासिक सभा दिनांक ०६/०१/२०१८ चे कार्यवृत्त**

| सभेची तारीख | उपस्थित सदस्याची नांवे | उपस्थित अधिका-यांची नांवे | संक्षिप्त अहवाल |
|---|---|---|---|
| **०६/०१/२०१८** | हजेरी रजिस्टर प्रमाणे | हजेरी रजिस्टर प्रमाणे | खाली नमुद प्रमाणे |

दिनांक ०६.०१.२०१८ ला दुपारी ठिक १.०० वाजता शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया ची मासिक सभा मा. श्री पी.जी.कटरे, सभापती, शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली तसेच सभेचे कामकाज चालविण्याकरिता जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे शासकिय विश्रामगृह, नवेगांवबांध, ता. अर्जुनी मोरगांव याठिकाणी सभा आयोजित करण्यांत आली होती. श्री यु.के.नरड, शिक्षणाधिकारी (प्राथ) यांनी सन्मा. सभापती, सन्मा. सदस्य व सभेमध्ये उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजाला सुरवात करण्यांत आली.

**विषय -०१ :- मागील सभेचे कार्यवृत्त वाचन करुन कायम करणे.**

**ठराव :-** मागील सभेतील कार्यवृत्ताचे वाचन श्री यु.के.नरड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी केले. त्यावर सभागृहात चर्चा होवून मागील सभा दिनांक दिनांक १०.११.२०१७ मासिक सभेतील विषय क्रं. १, २ तसेच मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने वेळेवर येणार अतिरिक्त विषय क्रं. ३/६, ३/१, ३/२, ३/३, ३/४, ३/५, ३/६, ३/७, ३/८, ३/९, ३/१०, ३/११, ३/१२कायम करण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ०२ :- प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राबाबत आढावा.**

**ठराव :-** शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत आजच्या सभेमध्ये तालुकानिहाय प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राबाबत गटशिक्षणाधिकारी यांनी आढावा सादर केला.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राबाबत गट शिक्षणाधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये १००% शाळा डिजिटल झालेल्या असून सर्व वर्ग सुध्दा डिजिटल करणेसाठी तसेच १००% विद्यार्थी प्रगत करणेसाठी नियोजनबध्द कार्यवाही करण्याचे निर्देश मा. सभाध्यक्षांनी दिले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं.३ :- मा. अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.**

सन्माननिय, सभापती, शिक्षण व क्रिडा समिती तसेच आरोग्य समिती, जिल्हा परिषद, गोंदिया तथा सन्माननिय सदस्यांनी समितीच्या सभेत खालील विषयावर पुढील सभेत चर्चा करण्याचे सूचविले.

**विषय क्रं. ३/१ :- केंद्रस्तरावर जिल्हा क्रीडा सत्र कार्यक्रम क्रमाक्रमाणे घेण्याबाबत.**

**ठराव :-** स्वदेशी खेळोत्तेजक मंडळाचे वतीने ग्रामीण भागातकेंद्र , तालुका व जिल्हास्तरावर क्रीडा सत्राचे कार्यक्रम आयोजित करण्यांत येतात. परंतु केंद्रातंर्गत प्रत्येक शाळांमध्ये कार्यक्रम आयोजित करण्यांच्या दृष्टीने क्रमाक्रमाणे कार्यक्रम घेण्यांत यावे, जेणेकरुन तालुकास्तरावर प्रत्येक केंद्रातील शाळांमध्ये कार्यक्रम होण्यास मदत होईल याबाबत गट शिक्षणाधिकारी यांनी कार्यवाही करण्याचे सन्मा. सभापती महोदयांनी सूचविले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/२ :-जिल्हा वार्षिक योजना, (अनुसूचित जाती उपयोजना) सन २०१७-१८ अंतर्गत अनुसूचित जातीच्या मुलींना मोफत सायकल पुरणेबाबत.**

**ठराव :-** जिल्हा वार्षिक योजना, (अनुसूचित जाती उपयोना) सन २०१७-१८ अंतर्गत अनुसूचित जातीच्या मुंलीना जिल्हा परिषद व्यवस्थापनेच्या शाळेतील वर्ग ५ ते १२ मध्ये शिकणा-या व शाळेपासून २ ते ५ मि.मी.अंतरावरुन येणे-जाणे करणा-या अनुसूचित जातीच्या मुलींना सायकल पुरविणेबाबत योजना आहे. परंतु सदर योजना अनुसूचित जातीच्या मुलींना देय आहे. सायकल वाटप योजना इतर योजनांमधून सुध्दा मुलींना देण्यांत येते. ज्यामूळे मुले सदर योजनांपासून वंचित राहतात. जर मुलींप्रमाणे अनुसूचित जातीच्या मुलांना सुध्दा सदर योजनेचा लाभ दिल्यास योजना प्रभावीपणे राबविण्यास मदत होईल याबाबत सन्मा. सभापती महोदयांनी सूचवून याबाबत शासन स्तरावर पाठपुरावा करण्याबाबत सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/३ :-जिल्हानिधी सन २०१७-१८ मध्ये लेखाशिर्ष १०१-५१जि.प. प्राथमिक शाळेची दुरुस्ती या लेखाशिर्षकामध्ये इतर अखर्चित राहणा-या योजनेतून रु. १३.५० लक्ष वळती करण्यांत आलेले अनुदान खर्च करुन कामांच्या यादीस मान्यता प्रदान करणेबाबत.**

**ठराव :-** जिल्हानिधी सन २०१७-१८ मध्ये लेखाशिर्ष १०१-२७ शाळा गृह कंपाऊंड वाल बांधकाम दुरुस्ती या लेखाशिर्षकामध्ये इतर अखर्चित राहणा-या योजनेतून रु. १३.५० लक्ष निधी दिनांक ८.१२.२०१७ च्या शिक्षण व क्रीडा समिती सभेमध्ये ठराव क्रं. ३/६ नुसार तसेच दिनांक १५.१२.२०१७ च्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये मंजूरी प्रदान करण्यांत आली आहे. त्यामूळे सदर मंजूर अनुदान खर्च करण्याचे व खालील प्रमाणे जि.प. प्राथमिक शाळेचीदुरुस्ती यादीला मंजुरी प्रदान करणेसाठी सन्मा. सभापती महोदयांनी सूचविले.

| अ. क्रं. | पं.स. चे नांव | जि.प.शाळेचे नांव | दुरुस्तीची किंमत (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| | | **जि.प. प्राथमिक शाळेची दुरुस्ती (लेखाशिर्ष १०१-५१)** | |
| १. | गोरेगांव | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डव्वा. | १.५० |
| २. | स/अर्जुनी | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बौध्दनगर | २.०० |
| ३. | स/अर्जुनी | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गोसाई/कोकणा | २.०० |
| ४. | तिरोडा | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पांजरा | २.०० |
| ५. | गोंदिया | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ढाकणी | १.५० |
| ६. | गोंदिया | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कलारीटोला/ बघोली | २.०० |
| ७. | गोंदिया | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चंगेरा | १.०० |
| ८. | गोंदिया | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लोधीटोला (चुटीया) | १.५० |
| | | **एकूण** | **१३.५०** |

सदर विषयावर साधक बाधक चर्चा होऊन उपरोक्त प्रमाणे जि.प.प्राथमिक शाळेची दुरुस्ती खर्चास व यादीला आजच्या सभेत मंजुरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/४ :-क्रींडागण योजनेतंर्गत रु. ५०.०० लक्ष च्या कामांना मंजूरी प्रदान करण्याबाबत.**

**ठराव :-** जिल्हा क्रीडा विभाग, गोंदिया अंतर्गत क्रींडागण विकासासाठी जिल्हा वार्षिक कार्ययोजना मध्ये सन २०१७-१८ अंतर्गत रु. ५०.०० लक्ष अनुदान मंजूर असून सदर मंजूर अनुदानानुसार खाली दिलेली क्रींडागण कामाची यादीला मंजूरी प्रदान करणेसाठी सन्मा. सभापती महोदयांनी सूचविले.

| **क्रीडांगण आवार भिंत बांधकाम (अनुदान रु. ५०.०० लक्ष)** | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्रं.** | **पं.स.चे नांव** | **शाळेचे नांव** | **रक्कम** |
| १. | आमगांव | जि.प.प्राथ.शाळा, ननसरी (आवार भिंत) | २.०० |
| २. | अर्जुनी मोरगांव | जि.प.प्राथ.शाळा, सिरोली (आवार भिंत) | २.०० |
| ३. | गोरेगांव | जि.प.प्राथ.शाळा, पिंडकेपार (आवार भिंत) | २.०० |
| ४. | गोरेगांव | जि.प.प्राथ.शाळा, म्हसगांव (आवार भिंत) | ३.०० |
| ५. | गोरेगांव | जि.प.प्राथ.शाळा, हिरडामाली(क्रींडागण सपाटीकरण) | २.०० |
| ६. | गोरेगांव | जि.प.प्राथ.शाळा, मोहगांव बु. (आवार भिंत) | २.०० |
| ७. | गोरेगांव | जि.प.प्राथ.शाळा, कंटगी/बु. (आवार भिंत) | ३.०० |
| ८. | गोरेगांव | जि.प.प्राथ.शाळा, घोटी (आवार भिंत) | २.०० |
| ९. | गोरेगांव | जि.प.प्राथ.शाळा, तानुटोला (आवार भिंत) | २.०० |
| १०. | गोरेगांव | जि.प.प्राथ.शाळा, गहलाटोला (आवार भिंत) | १.५० |
| ११. | गोंदिया | जि.प.प्राथ.शाळा, कन्हारटोला /काटी (आवार भिंत) | २.०० |
| १२. | गोंदिया | जि.प.प्राथ.शाळा, पिपरटोला / देवूटोला (आवार भिंत) | ३.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | गोंदिया | जि.प.प्राथ.शाळा, लंबाटोला (आवार भिंत) | २.०० |
| १५. | गोंदिया | जि.प.प्राथ.शाळा, मोरवाई (आवार भिंत) | २.०० |
| १६. | गोंदिया | जि.प.प्राथ.शाळा, दत्तोरा (आवार भिंत) | २.०० |
| १७. | गोंदिया | जि.प.प्राथ.शाळा, बिरसोला (आवार भिंत) | २.०० |
| १८. | गोंदिया | जि.प.प्राथ.शाळा, पारडीबांध(क्रींडागण सपाटीकरण) | १.०० |
| १९. | गोंदिया | जि.प.प्राथ.शाळा, देवुटोला (आवार भिंत) | १.०० |
| २०. | देवरी | जि.प.प्राथ.शाळा, मोहांडी (आवार भिंत) | २.०० |
| २०. | देवरी | जि.प.प्राथ.शाळा, पिंडकेपार(क्रींडागण सपाटीकरण) | १.०० |
| २१. | सालेकसा | जि.प.प्राथ.शाळा, दागुटोला (आवार भिंत) | २.०० |
| २२. | सालेकसा | जि.प.प्राथ.शाळा, कोटरा (आवार भिंत) | २.०० |
| २३. | सालेकसा | जि.प.प्राथ.शाळा, पिपरटोला धा.(क्रींडागण सपाटीकरण) | १.०० |
| २४. | तिरोडा | जि.प.प्राथ.शाळा, खैरबोडी (आवार भिंत) | २.०० |
| २५. | तिरोडा | जि.प.प्राथ.शाळा, जमुनिया (आवार भिंत) | २.०० |
| २६. | तिरोडा | जि.प.प्राथ.शाळा, करटी बु. (आवार भिंत) | १.०० |
| २७. | तिरोडा | जि.प.प्राथ.शाळा, विहिरगांव (क्रीडा साहित्य) | ०.५० |
| | | **एकूण-** | **५०.००** |

त्यावर आजच्या सभेमध्ये चर्चा होवून क्रींडागण विकासा करीता रु. ५०.०० लक्ष च्या कामांच्या यादीला मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/५ :-पंचायत समिती गोरेगांव अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गराडा बंद न करण्याबाबत.**

**ठराव :-** शासनाने गोंदिया जिल्हा परिषद अंतर्गत एकुण ३१ शाळां पटसंख्येअभावी बंद करुन शाळा व विद्यार्थी नजिकच्या शाळेत समायोजन करण्याबाबत आदेशीत आहे. पंरतु सदर गावातील पालक व विद्यार्थ्यांचा विरोध असल्यामूळे व गराडा ते मुंडीपार येथील अंतर अधीक असल्याने गैरसोय होणार असल्याने सदर शाळा या वर्षी बंद न करता पुढील वर्षी पटसंख्या वाढ न झाल्यास बंद करण्यास हरकत नाही असे सन्मा. सभापती महोदयांनी सूचविले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/६ :-जि.प.उ.प्रा.शाळा, बेलाटी/खुर्द, केंद्र कवलेवाडा, पं.स.तिरोडा येथे शालेय परिसरात एक नवीन वर्गखोली व एक शौचालय बांधकाम अदानी फांऊडेशन लि. तिरोडा तर्फे करण्याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

**ठराव :-** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बेलाटी/खुर्द, केंद्र कवलेवाडा, पं.स.तिरोडा येथे वर्गखोली कमी असल्यामूळे विद्यार्थ्यांना बसण्यास होणारी अडचण लक्षात घेवून अदानी फांऊडेशन, तिरोडा यांना एक नवीन वर्गखोली व शौचालय बांधकाम करण्याकरीता जि,प.प्राथमिक शाळा बेलाटी/खुर्द चे अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती व मुख्याध्यापक यांनी विनंती केलेली होती. त्यानुसार अदानी फांऊडेशन, तिरोडा ने सदर शाळेत एक नवीन वर्गखोली व एक शौचालय बांधकाम करण्याची विनंती मान्य केलेली असल्याचे पत्र क्रं. ४८७, दिनांक २६.१२.२०१७ च्या पत्रान्वये कळविलेले असून सदर बाधंकामाकरीता जिल्हा परिषदेची परवानगी आवश्यक असल्याने संबधीत बांधकामाची परवानगी घेऊन नाहरकत प्रमाणपत्र देण्यांची विनंती करण्यात आली आहे.

त्यावर आजच्या सभेमध्ये उपरोक्त प्रमाणे सदर पत्रानुसार जि.प. उच्च प्राथमिक शाळा, बेलाटी/ खुर्द येथे अदानी फांऊडेशन, तिरोडा तर्फे एक नवीन वर्गखोली व एक शौचालय बांधकाम करण्याची परवानगी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मंजूर नकाशा व आराखडा प्रमाणे व त्यांच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून बांधकाम करण्यात यावे. बांधकाम दर्जेदार व गुणवत्तेदार करण्यांत यावे. बांधकाम पूर्ण झाल्यावर जिल्हा परिषदेला हस्तांतरण करण्यांत यावे. जिल्हा परिषदेच्या इमारतीला देण्यांत येणा-या रंगरंगोटी करण्यांत यावी तसेच पंचायत समितीच्या मालमत्ता

नोंदवही मध्ये नोंद घेण्याचे अटीच्या अधीन राहून शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे स्वाक्षरीने नाहरकत प्रमाणपत्र अदानी फांऊडेशन, तिरोडा यांना देण्याचे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/७ :-जि.प.उ.प्रा.शाळा, भंबोडी, पं.स.तिरोडा या शाळेतील धोकादायक व जिर्ण इमारत पाडण्याची परवानगी देण्याबाबत.**

**ठराव :-** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, भंबोडी, पं.स.तिरोडा येथे सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन २०१७-१८ या वर्षात एक नवीन वर्गखोलीचे बांधकाम मंजूर झालेले असून सदर बांधकाम करण्याकरीता शालेय परिसरात जागेचा तुटवडा असून शाळेतील अस्तित्वात असलेल्या जुन्या जिर्ण व धोकादायक असलेल्या इमारतीला पाडून सदर जागेवर मंजूर बांधकाम करण्याचे संबधीत शाळा व्यवस्थापन समिती ने ठरविलेले आहे. या धोकादायक व जिर्ण असलेल्या वर्गखोलीत मागिल दोन वर्षापासून विद्यार्थ्यांना बसण्यास गट शिक्षणाधिकारी, पं.स.तिरोडा यांनी पाहणी करुन मनाई केलेली आहे. सदर वर्गखोली अतिशय धोकादाय असल्याने शालेय परिसरात जागा गुंतवून ठेवत असल्याने लवकरात लवकर ही वर्गखोली पाडण्याची परवानगी दयावी असे शाळा व्यवस्थापन समिती समिती, जि.प. उच्च प्राथमिक शाळा, भंबोडी यांनी दिनांक १० जून, २०१७ च्या सभेतील ठरावानुसार कळविले आहे.

उपरोक्त प्रमाणे विषयावर आजच्या सभेमध्ये विस्तृत चर्चा झाली व सर्व शिक्षा अभियान सन २०१७-१८ या वर्षात जि.प.प्राथमिक शाळा, बंभोडी येथे मंजूर एक वर्गखोलीचे बांधकाम शाळेतील जागेच्या तुटवडयामूळे सुरु होवू शकले नाही. तसेच शालेय परिसरात असलेल्या जिर्ण व धोकादायक इमारतीला पाडण्याची रितसर परवानगी देण्यांत यावी असे सभेत सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. ०४ : शिक्षण व क्रिडा समिती सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करणे.**

**ठराव क्र. ०४: शिक्षण व क्रिडा समिती सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करण्यात आले.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

यानंतर सभागृहासमोर विषय नसल्यामुळे सर्व सन्मा. सभापती, सन्मा. सर्व सदस्य यांनी आजच्या सभेला उपस्थित राहुन आजच्या सभेचे कामकाज चालविण्यास सहकार्य केले त्या बद्दल श्री. यु.के.नरड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी उपस्थित सर्वाचे आभार व्यक्त केले व मा. अध्यक्षाच्या परवानगीने आजची सभा संपल्याचे जाहिर केले.

| | |
|---|---|
| **स्वा/-** | **स्वा/-** |
| सचिव,तथा | अध्यक्ष |
| शिक्षणाधिकारी (प्राथ) | शिक्षण व क्रिडा समिती, |
| जिल्हा परिषद, गोंदिया. | जिल्हा परिषद, गोंदिया. |

**शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया ची मासिक सभा दिनांक ०६/०२/२०१८ चे कार्यवृत्त**

| सभेची तारीख | उपस्थित सदस्याची नांवे | उपस्थित अधिका-यांची नांवे | संक्षिप्त अहवाल |
|---|---|---|---|
| **०६/०२/२०१८** | हजेरी रजिस्टर प्रमाणे | हजेरी रजिस्टर प्रमाणे | खाली नमुद प्रमाणे |

दिनांक ०६.०२.२०१८ ला सकाळी ठिक ११.०० वाजता शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया ची मासिक सभा मा. सौ. सिमा मडावी, अध्यक्ष, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली तसेच सभेचे कामकाज चालविण्याकरिता त्यांचे कक्षात सभा आयोजित करण्यांत आली. श्री यु.के.नरड, शिक्षणाधिकारी (प्राथ) यांनी सन्मा. अध्यक्ष, सन्मा. सदस्य व सभेमध्ये उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजाला सुरवात करण्यांत आली.

**विषय -०१ :- मागील सभेचे कार्यवृत्त वाचन करुन कायम करणे.**

**ठराव :-** मागील सभेतील कार्यवृत्ताचे वाचन श्री यु.के.नरड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी केले. त्यावर सभागृहात चर्चा होवून मागील सभा दिनांक दिनांक ०६.०१.२०१८ मासिक सभेतील विषय क्रं. १, २ तसेच मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने वेळेवर येणार अतिरिक्त विषय क्रं. ३/१, ३/२, ३/३, ३/४, ३/५, ३/६, ३/७ कायम करण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ०२ :- प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राबाबत आढावा.**

**ठराव :-** शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत आजच्या सभेमध्ये तालुकानिहाय प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राबाबत गटशिक्षणाधिकारी यांनी आढावा सादर केला.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राबाबत गट शिक्षणाधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये १००% शाळा डिजिटल झालेल्या असून सर्व वर्ग सुध्दा डिजिटल करणेसाठी तसेच १००% विद्यार्थी प्रगत करणेसाठी नियोजनबध्द कार्यवाही करण्याचे निर्देश मा. सभाध्यक्षांनी दिले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं.३ :- मा. अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.**

सन्माननिय, अध्यक्ष, जिल्हा परिषद, गोंदिया तथा सन्माननिय सदस्यांनी समितीच्या सभेत खालील विषयावर पुढील सभेत चर्चा करण्याचे सूचविले.

**विषय क्रं. ३/१ :- "गुडी पाडवा प्रवेश वाढवा" हा उपक्रम राबविण्याबाबत.**

**ठराव :-** जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत इयत्ता १ ली, ५ वी, ८ वी व इयत्ता ११ मध्ये माहे जुलै मध्ये प्रवेश पक्रीया केली जाते. त्यामूळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविण्याच्या दृष्टीने दिनांक १८ मार्च, २०१८ रोजी **"गुडी पाडवा प्रवेश वाढवा"** हा उपक्रम राबविण्याबाबत श्री यु.के.नरड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सूचविले.

गुडी पाडव्याच्या दिवशी भरती पात्र विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी शाळेमध्ये तोरण लावून गुडी उभारली जाईल, शाळेत सडा-सारवण करण्यांत येईल, त्यामूळे शालेय परिसर स्वच्छ, मंगलमय व उत्साहाचे राहील. अशा वातावरणात विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करण्यांत येईल व त्यांना माहे जुलै पासून प्रवेश दिला जाईल. त्यामूळे जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविण्यास मदत होईल असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सूचविले.

त्यावर आजच्या सभेमध्ये जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविण्याच्या दृष्टीने जिल्हयातील सर्व शाळांमध्ये दिनांक १८ मार्च, २०१८ रोजी **"गुडी पाडवा प्रवेश वाढवा"** हा उपक्रम राबविण्यात यावे. त्यासाठी जिल्हयातील सर्व गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, मुख्याध्यापक व शिक्षक यांनी सर्वतोपरी सहकार्य करावे असे ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/२ :- अध्ययन स्तर निश्चिती दुसरा टप्पा बाबत.**

**ठराव :-** जिल्हा शैक्षणिक सातत्यपुर्ण व्यावसायिक विकास संस्था, गोंदिया तथा शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत इयत्ता १ ली ते ८ वी मधील विद्यार्थ्यांकरीता भाषा व गणित या विषयात गोंदिया जिल्हा अध्ययन स्तर कार्यक्रम निश्चिती करण्यांत आले असून त्याचे उदिष्टये खालील प्रमाणे आहेत.

<u>**अध्ययन स्तर निश्चितीचे उदिष्टये**</u>

- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांची अध्ययन स्त्र निश्चिती.
- इयत्ता १ ली ते ८ वी च्या १०० टक्के विद्यार्थ्यांना भाषा व गणितातील १०० टक्के मुलभूल क्षमता प्राप्त होण्यासाठी शिक्षकांना मदत करणे.
- CRG व BRG चे कार्यान्वित करणे.
- CRG व BRG मदतीने १०० टक्के शाळांना सहाय्य करणे.
- २० एप्रिल, २०१८ पर्यंत इयत्ता १ ली ते ८ वी व्या १०० टक्के विद्यार्थ्यांना १०० मुलभूत क्षमता प्राप्त करण्यास सहाय्य करणे.

अध्ययन स्तर निश्चिती कार्यक्रमाचा पहिला टप्पा २० फेब्रुवारी, २०१८ पर्यंत पूर्ण करावयाचे असून दिनांक २० फेब्रुवारी, २०१८ पासून अध्ययन स्तर निश्चिती दुसरा टप्पा पूर्ण करण्याबाबतचे कार्यक्रम निश्चित करण्यांत आले असल्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सांगितले.

- २० ते २४ फेब्रुवारी, २०१८ अध्ययन स्तर निश्चिती दुसरा टप्पा
- दिनांक ३.३.२०१८ गटसमन्वयक, विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख मंथन सभा, विश्लेषण व कृती कार्यक्रम निर्मिती
- दिनांक ७ मार्च, २०१८ गट शिक्षणाधिकारी सभा, पर्यवेक्षण व BRG व CRG सक्षमीकरण चर्चा
- दिनांक ७ ते २० मार्च, २०१८ विषयनिहाय, क्षमता निहाय कृती कार्यक्रम कार्यवाही.

त्यावर आजच्या सभेमध्ये चर्चा होऊन वरील प्रमाणे गोंदिया जिल्हा अध्ययन स्तर निश्चिती कार्यक्रमामाच्या माध्यमातून इयत्ता १ ते ८ वी च्या विद्यार्थ्यांचे अध्ययन स्तर निश्चिती करीता गट शिक्षणाधिकारी यांनी तालुकास्तरावर सहाय्य करण्याचे ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/३ :- शाळाबाहय विद्यार्थ्यांसाठी बालरक्षक चळवळ.**

**ठराव :-** जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक ९ जानेवारी, २०१७ अन्वये शाळाबाहय मुलांना शाळेत आणून गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्यास प्राधान्यक्रम देऊन बालरक्षक संकल्पना पुढे आली आहे.

शाळाबाहय मुलांच्या समस्या विभिन्न स्वरुपाच्या आहेत. ती शाळाबाहय होण्याची कारणेही विविध सांगितली जातात. या मुलांचा शोध घेऊन त्यांना नियमित शाळेत दाखल करुन नियमितपणे शिकवण्यासाठी त्यांना मदतीची गरज आहे. त्यासाठी या विषयाशी निगडीत झपाटयाने काम करणा-या यंत्रणेतील व्यक्तींची भूमिका महत्वाची ठरणारी आहे. त्यामुळे शासन व्यवस्थेत झपाटयाने काम करणा-या व्यक्तींची मदत घेण्यात येणार आहे.

शाळाबाहय मुलांसाठी झपाटयाने काम करण्यासाठी प्रत्येक तालुक्यातून किमान दोन आणि आदिवासी बहुल विधि बोलीभाषेच्या क्षेत्रातील (अर्जुनी मोरगांव, सालेकसा, देवरी) प्रत्येक केंद्रामधून प्रत्येक दोन व्यक्तींची निवड करावयाची आहे. शहरी भागात प्रत्येक केंद्रातून किमान ५ व्यक्तींची निवड करण्यासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सर्व गट शिक्षणाधिकारी यांनी निर्देश दिले.

त्यावर आजच्या सभेमध्ये चर्चा होवून शाळाबाहय विद्यार्थ्यांसाठी बालरक्षक https://goo.gl/forms/ CY4nzUHYUL06wN2C2 या लिंकवर शिक्षकांनी नोंदणी करण्यासाठी गट शिक्षणाधिकारी यांनी आपल्या स्तरावर सर्व मुख्याध्यापकांना निर्देशीत करण्याचे ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/४ :- जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा सकाळ पाळीत सुरु करण्याबाबत.**

**ठराव :-** जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा सध्या दुपार पाळीत भरत असून उन्हाची चाहूल सुरु झाल्यामूळे शाळा सकाळ पाळीत सुरु करण्याबाबत सभेमध्ये निदर्शनास आणून देण्यांत आले.

त्यावर आजच्या शिक्षण व क्रीडा समिती सभेमध्ये जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत सर्व प्राथमिक/ उच्च प्राथमिक शाळा सकाळ पाळीत भरविण्याबाबत वेळापत्रकाच्या सूचनांसह परिपत्रक काढण्याबात पुढील सभेत चर्चा करण्याचे ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. ०४ : शिक्षण व क्रिडा समिती सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करणे.**

**ठराव क्र. ०४: शिक्षण व क्रिडा समिती सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करण्यात आले.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

यानंतर सभागृहासमोर विषय नसल्यामुळे सर्व सन्मा. अध्यक्ष, सन्मा. सर्व सदस्य यांनी आजच्या सभेला उपस्थित राहुन आजच्या सभेचे कामकाज चालविण्यास सहकार्य केले त्या बद्दल श्री. यु.के.नरड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी उपस्थित सर्वाचे आभार व्यक्त केले व मा. अध्यक्षाच्या परवानगीने आजची सभा संपल्याचे जाहिर केले.

**स्वा/-**
सचिव,तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, गोंदिया.

**स्वा/-**
अध्यक्ष
जिल्हा परिषद, गोंदिया.

**शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया ची विशेष सभा दिनांक १/३/२०१८ चे कार्यवृत्त**

| सभेची तारीख | उपस्थित सदस्याची नांवे | उपस्थित अधिका-यांची नांवे | संक्षिप्त अहवाल |
|---|---|---|---|
| **१/३/२०१८** | हजेरी रजिस्टर प्रमाणे | हजेरी रजिस्टर प्रमाणे | खाली नमुद प्रमाणे |

दिनांक १.३.२०१८ ला सकाळी ठिक ११.०० वाजता शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया ची विशेष सभा मा.रमेश अंबुले, सभापती, शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली तसेच सभेचे कामकाज चालविण्याकरिता त्यांचे कक्षात सभा आयोजित करण्यांत आली. श्री यु.के.नरड, शिक्षणाधिकारी (प्राथ) यांनी सन्मा. सभापती, सन्मा. सदस्य व सभेमध्ये उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजाला सुरवात करण्यांत आली.

**विषय क्रं. ०१ :-गोंदिया जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीच्या सदस्यांमधून पदविधर असलेला एक सदस्य शिक्षण समितीद्वारा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अधिसभेवर एक वर्षाच्या कालावधीकरिता नामनिर्देशित करण्याबाबत.**

**ठराव :-** मा.कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांचे पत्र क्रं. रातुमनावि/साप्र/१८/२७८/२०१८, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१८ नुसार विद्यापीठ क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या शिक्षण समित्यांच्या सदस्यामधून **पदवीधर** असलेला एक सदस्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अधिसभेवर शिक्षण समितीद्वारा नामनिर्देशित सदस्याचे नांव कळविण्याबाबत निर्देशीत आहे.

त्यानुषंगाने मा. सभापती, शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी निर्देशीत केल्याप्रमाणे जिल्हा परिषद शिक्षण व क्रिडा समितीची आज दिनांक १.३.२०१८ रोजी तातडीची विशेष सभा घेण्यांत आली.शिक्षण व क्रीडा समितीमधे एकूण ३ पदविधर सदस्यांपैकी सौ. रचना चामेश्वर गहाणे यांचे नांव अधिसभेवर जाण्यासाठी मा. रमेश अंबुले, सभापती, शिक्षण व क्रीडा समिती यांनी सूचविले. सन्मा. सदस्या सौ. माधुरी पातोडे यांनी सन्मा. सदस्या सौ. रचनाताई गहाणे यांच्या नावाला अनुमोदक दिले. त्यावर सन्मा. सदस्य श्री राजेश भक्तवर्ती, सौ. रजनी गौतम, सौ. विना बिसेन, सौ. प्रिती रामटेके या चार सदस्यांनी त्यांच्या नावाला विरोध असल्याचे सूचविले. पंरतू सन्मा. सदस्या सौ. रचना गहाणे यांच्या नावा व्यतिरिक्त अधिसभेवर जाण्यासाठी सूचक व अनुमोदक नसल्याने बहुमतानेजिल्हा परिषद शिक्षण व क्रीडा समिती समित्यांच्या सदस्यामधून पदवीधर असलेल्या**सौ. रचनाताई चामेश्वर गहाणे, सदस्या**यांच्या नावाला मंजूरी प्रदान करण्यांत आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. ०२ : शिक्षण व क्रिडा समिती सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करणे.**

**ठरावः शिक्षण व क्रिडा समिती सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करण्यात आले.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

यानंतर सभागृहासमोर विषय नसल्यामुळे सर्व सन्मा. सभापती, सन्मा. सर्व सदस्य यांनी आजच्या सभेला उपस्थित राहुन आजच्या सभेचे कामकाज चालविण्यास सहकार्य केले त्या बद्दल श्री. यु.के.नरड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी उपस्थित सर्वाचे आभार व्यक्त केले व मा. अध्यक्षाच्या परवानगीने आजची सभा संपल्याचे जाहिर केले.

स्वा/-
सचिव,तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, गोंदिया.

स्वा/-
अध्यक्ष
शिक्षण व क्रिडा समिती,
जिल्हा परिषद, गोंदिया.

**शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया ची मासिक सभा दिनांक १५/०३/२०१८ चे कार्यवृत्त**

| सभेची तारीख | उपस्थित सदस्याची नांवे | उपस्थित अधिका-यांची नांवे | संक्षिप्त अहवाल |
|---|---|---|---|
| **१५/०३/२०१८** | हजेरी रजिस्टर प्रमाणे | हजेरी रजिस्टर प्रमाणे | खाली नमुद प्रमाणे |

दिनांक १५.०३.२०१८ ला सकाळी ठिक ११.०० वाजता शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया ची मासिक सभा मा. रमेश शोभेलाल अंबुले, सभापती, शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली तसेच सभेचे कामकाज चालविण्याकरिता त्यांचे कक्षात सभा आयोजित करण्यांत आली. श्री उल्हास के.नरड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सन्मा. सभापती, सन्मा. सदस्य व सभेमध्ये उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजाला सुरवात करण्यांत आली.

**विषय -०१ :- मागील सभेचे कार्यवृत्त वाचन करुन कायम करणे.**
**ठराव :-** मागील सभेतील कार्यवृत्ताचे वाचन श्री उल्हास के.नरड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी केले. त्यावर सभागृहात चर्चा होवून मागील सभा दिनांक दिनांक ०६.०२.२०१८ मासिक सभेतील विषय क्रं. १, २ तसेच मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने वेळेवर येणार अतिरिक्त विषय क्रं. ३/१, ३/२, ३/३, कायम करण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ०२ :- प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राबाबत आढावा.**
**ठराव :-** शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत आजच्या सभेमध्ये तालुकानिहाय प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राबाबत गटशिक्षणाधिकारी यांनी आढावा सादर केला.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राबाबत गट शिक्षणाधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये १००% शाळा डिजिटल झालेल्या असून सर्व वर्ग सुध्दा डिजिटल करणेसाठी तसेच १००% विद्यार्थी प्रगत करणेसाठी नियोजनबध्द कार्यवाही करण्याचे निर्देश मा. सभाध्यक्षांनी दिले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं.३ :- मा. अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.**

सन्माननिय, सभापती, शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया तथा सन्माननिय सदस्यांनी समितीच्या सभेत खालील विषयावर पुढील सभेत चर्चा करण्याचे सूचविले.

**विषय क्रं. ३/४ :- जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा सकाळ पाळीत सुरु करण्याबाबत.**
**ठराव :-** जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा सध्या दुपार पाळीत भरत असून उन्हाची चाहूल सुरु झाल्यामूळे शाळा सकाळ पाळीत सुरु करण्याबाबत सभेमध्ये निदर्शनास आणून देण्यांत आले.

त्यावर दिनांक १५.०३.२०१८ च्या शिक्षण व क्रीडा समिती सभेमध्ये जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत सर्व प्राथमिक/ उच्च प्राथमिक शाळा सकाळ पाळीत भरविण्याबाबत वेळापत्रकाच्या सूचनांसह परिपत्रक काढण्याबात पुढील सभेत चर्चा करण्याचे ठरविण्यांत आले.

त्यानुषंगाने आजच्या शिक्षण व क्रीडा समिती सभेमध्ये जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत सर्व प्राथमिक/ उच्च प्राथमिक शाळा **दिनांक २१.०३.२०१८ पासून सकाळ पाळीत** भरविण्याबाबत खालील वेळापत्रकाच्या सूचनांसह ठरविण्यांत आले.

- शाळा सकाळी ७.१५ ते १२.१५ या वेळेत भरविण्यांत यावे.
- शाळेचा पहिला सत्र सकाळी ७.१५ ते ९.३० पर्यत राहील.
- सकाळी ९.३० ते १०.०० या वेळेत विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन देण्यांत यावे.
- शाळेचा दुसरा सत्र सकाळी १०.०० ते १२.१५ राहील.

- शाळा सकाळ पाळीत भरवितांना विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही तसेच आर.टी.ई. निकषानुसार तासिका पुर्ण होतील याची दक्षता घ्यावी.
- दिवसाचे तापमान अधिक उष्ण नसेल अशावेळेस पालकांच्या/ गावाच्या मागणीनुसार शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षक दुपारची शाळा भरविण्याची कार्यवाही करु शकतील.
- सदर कालावधीमध्ये अध्ययन स्तर निश्चितीचा कार्यक्रम सुरु आहे. जिल्हयामध्ये २ टप्पे पूर्ण झालेली असून २ टप्पे शिल्लक आहेत. ज्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी अपेक्षित मुलभूल क्षमता प्राप्त केली नसेल अशा शाळा सायंकाळी ४.०० ते ५.३० या कालावधीत आवश्यकतेनुसार वाचन कौशल्य व भागाकार क्षमता उपक्रम विकसित करण्याकरीता अतिरिक्त तासिका घेवू शकतील.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/१ :- सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी यांचे एक वर्षावरील प्रवास भत्ता देयकांना मंजूरी प्रदान करणेबाबत.**

**ठराव :-** शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत श्री पी.पी.तुरकर, से.नि. शिक्षण विस्तार अधिकारी यांचे माहे मार्च, २०१२ ते जून, २०१३ पर्यंत एकूण २९,६१४/- (रुपये- एकोनतीस हजार सहाशे चौदा फक्त) व श्री एस.एल.रामरामे, से.नि. शिक्षण विस्तार अधिकारी यांचे माहे ऑक्टोबर, २०१२ ते सप्टेंबर, २०१५ पर्यंत एकूण ४०,६८२/- (रुपये- चाळीस हजार सहाशे ब्यांशी फक्त) अनुदान प्राप्त नसल्याने प्रलंबित होते. त्यामूळे संबधीत शिक्षण विस्तार अधिकारी यांचे एक वर्षावरील देयके सन २०१७-१८ या वर्षात मंजूर करण्याबाबत सभेला विनंती करण्यात आली.

त्यावर आजच्या सभेमध्ये चर्चा होवून शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत से.नि. शिक्षण विस्तार अधिकारी श्री पी.पी.तुरकर, माहे. यांचे मार्च, २०१२ ते जून, २०१३ पर्यंत एकूण २९,६१४/- व श्री एल.एल.रामरामे, ऑक्टोबर, २०१२ ते सप्टेंबर, २०१५ पर्यंत एकूण ४०,६८२/- च्या प्रवास देयकाच्या रक्कमेला सन २०१७-१८ मध्ये खर्च करण्याची मंजूरी प्रदान करण्यांत येत असल्याचे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/२ :-गावची शाळा आमची शाळा जिल्हानिधी लेखाशिर्ष १०१-१९/३ या उपप्रकल्पातंर्गत मंजूर तरतुद व खर्चास मंजूरी प्रदान करणेबाबत.**

**ठराव :-** आर्थीक वर्ष २०१७-१८ मध्ये जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत शाळांच्या व विद्यार्थ्यांच्या दर्जा उंचविण्याकरिता गावची शाळा आमची शाळा हा अभिनव उपक्रम राबविण्यांत येत आहे. या प्रकपाच्या अंमलबजावणीसाठी रु. २५.०० लक्ष तरतूद जिल्हा निधीतून मंजूर असून त्यामधून शाळांचे मुल्यांकन करण्यासाठी तालुका व प्रभास्तरावर निधी वितरीत करण्यासाठी तसेच सदर प्रकल्पातंर्गत तालुका व जिल्हास्तरावर पुरस्कार देण्यासाठी जिल्हानिधी लेखाशिर्ष १०१-१९/३ गावची शाळा आमची शाळा या उपक्रमातंर्गत रु. २५.०० लक्ष मंजूर तरतुदीस व येणा-या खर्चास आजच्या सभेमध्ये मंजूरी प्रदान करण्यांत येते.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/३ :- जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांचे वेतनाबाबत.**

**ठराव :-** जिल्हा परिषद, गोंदिया कार्यरत प्राथमिक शिक्षकांचे वेतन उशिरा होत असल्याने गट शिक्षणाधिकारी यांनी जिल्हा स्तरावर वेळेच्या आंत तालुकानिहाय प्राथमिक शिक्षकांचे देयके सादर करावे, जेणेकरुन प्राथमिक शिक्षकांचे वेतन नियमित तारखेला अदा करणे शक्य होईल असे सन्मा. सभापती महोदयांनी निर्देश दिले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. ०४ : शिक्षण व क्रिडा समिती सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करणे.**

**ठराव क्र. ०४:  शिक्षण व क्रिडा समिती सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करण्यात आले.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

यानंतर सभागृहासमोर विषय नसल्यामुळे सर्व सन्मा. सभापती, सन्मा. सर्व सदस्य यांनी आजच्या सभेला उपस्थित राहुन आजच्या सभेचे कामकाज चालविण्यास सहकार्य केले त्या बद्दल श्री. उल्हास के. नरड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी उपस्थित सर्वाचे आभार व्यक्त केले व मा. अध्यक्षाच्या परवानगीने आजची सभा संपल्याचे जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| सचिव,तथा | अध्यक्ष |
| शिक्षणाधिकारी (प्राथ) | शिक्षण व क्रिडा समिती, |
| जिल्हा परिषद, गोंदिया. | जिल्हा परिषद, गोंदिया. |

**शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया ची मासिक सभा दिनांक १७/०४/२०१८ चे कार्यवृत्त**

| सभेची तारीख | उपस्थित सदस्याची नांवे | उपस्थित अधिका-यांची नांवे | संक्षिप्त अहवाल |
|---|---|---|---|
| **१७/०४/२०१८** | हजेरी रजिस्टर प्रमाणे | हजेरी रजिस्टर प्रमाणे | खाली नमुद प्रमाणे |

दिनांक १७.०४.२०१८ ला सकाळी ठिक ११.०० वाजता शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया ची मासिक सभा मा. रमेश शोभेलाल अंबुले, सभापती, शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली तसेच सभेचे कामकाज चालविण्याकरिता त्यांचे कक्षात सभा आयोजित करण्यांत आली. श्री उल्हास के.नरड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सन्मा. सभापती, सन्मा. सदस्य व सभेमध्ये उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजाला सुरवात करण्यांत आली.

**विषय -०१ :- मागील सभेचे कार्यवृत्त वाचन करुन कायम करणे.**

**ठराव :-** मागील सभेतील कार्यवृत्ताचे वाचन श्री उल्हास के.नरड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी केले. त्यावर सभागृहात चर्चा होवून मागील सभा दिनांक दिनांक १५.०३.२०१८ मासिक सभेतील विषय क्रं. १, २ तसेच मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने वेळेवर येणार अतिरिक्त विषय क्रं. ३/१, ३/२, ३/३, कायम करण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ०२ :- प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राबाबत आढावा.**

**ठराव :-** शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत आजच्या सभेमध्ये तालुकानिहाय प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राबाबत गटशिक्षणाधिकारी यांनी आढावा सादर केला.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राबाबत गट शिक्षणाधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये १००% शाळा डिजिटल झालेल्या असून सर्व वर्ग सुध्दा डिजिटल करणेसाठी तसेच १००% विद्यार्थी प्रगत करणेसाठी नियोजनबध्द कार्यवाही करण्याचे निर्देश मा. सभाध्यक्षांनी दिले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं.३ :- मा. अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.**

सन्माननिय, सभापती, शिक्षण व क्रीडा समिती, जिल्हा परिषद, गोंदिया तथा सन्माननिय सदस्यांनी समितीच्या सभेत खालील विषयावर पुढील सभेत चर्चा करण्याचे सूचविले.

**विषय क्रं. ३/१ :- सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वार्षीक कार्ययोजना व अंदाजपत्रक सन २०१८-१९ करीता बांधकाम विषयक मार्गदर्शक सूचना व प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**ठराव :-** महाराष्ट्र प्राधिकरण शिक्षण परिषद मुंबई यांचे पत्र क्रं. मप्राशिप/सशिअ/बांध/वाकाअंप/२०१८-१९/१३३९, दिनांक १३ एप्रिल, २०१८ अन्वये सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व शिक्षक शिक्षण या तिन्ही योजना एकत्रीत पणे राबविण्यांत येणार असल्याबाबत भारत सरकारच्या सूचनेनुसार बांधकाम विषयक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यांत आलेल्या आहेत. या सूचनेनुसार बांधकाम विषयक प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना आहेत. त्यानुसार सभेमध्ये विस्तृत चर्चा करण्यांत आली.

**१) आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा :**

जिल्हयातील ज्या तालुक्यामध्ये १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांची संख्या जास्त आहे अशा एक किंवा दोन तालुक्यामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा तालुक्याच्या अथवा अशा सर्व शाळांच्या केंद्रात असलेल्या शाळेत आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा निवडावयाची आहे. त्यानुसार तालुकानिहाय शाळा संख्या आमगांव-१०, अर्जुनी मोरगांव-०६, देवरी-१४, गोंदिया-२, गोरेगांव-०८, सडक अर्जुनी-०८, सालेकसा-०९, तिरोडा-०६ याप्रकारे आहेत. देवरी तालुक्यामध्ये या सर्वात जास्त शाळा आहेत त्या तालुक्याच्या ठिकाणी व आमगांव तालुक्यातील जि.प.उच्च प्राथमिक शाळा, बोरकन्हार येथे आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा प्रस्तावीत करण्यांत आली आहे.

**२) ओजस शाळा :**

शासन निर्णय दिनांक ३०.११.२०१७ नुसार राज्यात आंतरराष्ट्रीय शैक्षणिक दर्जाची शाळा म्हणून मान्यता मिळण्यासाठी राज्यस्तरावर निवडप्रक्रीया घेण्यांत आली होती. सदर निवड परिषदेत सहभागी एकूण १०६ शाळांमधून उत्कृष्ठ कामगिरी असलेली प्रत्येक विभागातून पात्र असणा-या एकूण १३ शाळांना आंतरराष्ट्रीय शाळा म्हणून मान्यता प्रदान करण्यांत आली आहे. नागपूर विभागातून गोंदिया जिल्हयातील शहीद जाम्या तिम्या जिल्हा परिषद हॉयस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, गोरेगांव या शाळेची निवड करण्यांत आलेली असून सदर शाळेला आवश्यक व भौतीक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्लॉन, नकाशा, प्रस्तावाहीत महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद, मंत्रालय, मुंबई यांना सादर करण्यात आले आहे.

**३) जिल्हा शैक्षणिक सातत्यपुर्ण व्यवसायिक विकास संस्था (DIECPD) :**

गोंदिया जिल्हयात जिल्हा शैक्षणिक सातत्यपुर्ण व्यावसायीक विकास संस्था, गोंदिया **(DIECPD)** या कार्यालयाची स्वतःची शासकिय इमारत नाही. याकरीता खमारी तालुका गोंदिया येथे ०.९९ हे.आर. जागा या कार्यालयाच्या इमारतीसाठी राखीव करण्यांत आली होती. परंतू सदर इमारतीचे काम सुरु न झाल्याने व अंत्यत आवश्यकतेनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र खमारी च्या इमारतीचे बांधकाम या जागेवर सुरु झालेले आहे. शैक्षणिक सातत्यपुर्ण व्यावसायीक विकास संस्था, गोंदिया **(DIECPD)** या कार्यालयाच्या इमारतीकरीता मौजा झांजिया तालुका गोरेगांव येथे गोंदियावरुन १० कि.मी. अंतरावर शासकिय जागा उपलब्ध असून या जागेसंबधीचे सर्व आवश्यक कागदपत्रे जमा करण्यात आलेले आहे. याबाबत सभेमध्ये विस्तृत चर्चा झाली व गोंदियाच्या जवळपास जर आवश्यक शासकिय जागा उपल्बध झाल्यास त्याचा विचार करावा असे सर्वानुमते ठरले.

**४) अतिरिक्त वर्गखोली :**

UDISE २०१७-१८ नुसार जिल्हयात पटसंख्या व शिक्षक संख्य निकषाच्या आधारावर २३२ अतिरिक्त वर्गखोल्यांची गरज आहे. याप्रमाणे सर्व शिक्षा अभियान अंतर्गत हे सर्व वर्गखोल्या वार्षीक कार्ययोजना व अंदाजपत्रक सन २०१८-१९ मध्ये मंजूरीसाठी प्रस्तावीत करण्यांत आलेल्या आहेत.

**५) मुलां व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे :**

UDISE २०१७-१८ नुसार जिल्हयात जि.प.च्या एकूण १०६५ शाळा असून या सर्व शाळांमध्ये मुलां व मुलींकरीता स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय करण्यांत आलेली होती. परंतू मुलांसाठीचे १९९ व मुलींसाठीचे १५७ स्वच्छतागृह नादुरुस्त असून हे सर्व स्वच्छतागृहे उपयोगात यावे, याकरीता वार्षीक कार्ययोजना व अंदाजपत्रक सन २०१८-१९ मध्ये मंजूरीसाठी प्रस्तावीत करण्यांत आलेले आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/२ :- सन २०१८-१९ या सत्रापासून जिल्हा परिषद हॉयस्कूल, देवरी येथे इयत्ता ५ वी सुरु करणेबाबत.**

**ठराव :-** जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत जिल्हा परिषद हॉयस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, देवरी ही शाळा बंद पडलेली आहे. जिल्हयातील ज्या तालुक्यामध्ये १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांची संख्या जास्त आहे अशा एक किंवा दोन तालुक्यामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा तालुक्याच्या अथवा अशा सर्व शाळांच्या केंद्रात असलेल्या शाळेत आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा निवडावयाची आहे. देवरी तालुक्यामध्ये सर्वात जास्त शाळा आहेत. त्यामूळे सन २०१८-१९ या सत्रापासून जिल्हा परिषद हॉयस्कूल, देवरी हया बंद पडलेल्या शाळेमध्ये इयत्ता ५ वा वर्ग सुरु करण्याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सभागृहाला विनंती केली.

त्यावर आजच्या सभेमध्ये चर्चा होवून देवरी तालुक्यामध्ये जिल्हा परिषद शाळा टिकून राहण्यासाठी तसेच शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी सन २०१८-१९ या सत्रापासून जिल्हा परिषद हॉयस्कूल, देवरी हया बंद पडलेल्या शाळेमध्ये इयत्ता ५ वा वर्ग सुरु करण्याबाबत गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, देवरी यांनी तात्काळ अंमलबजावणी करावी असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/३ :- जिल्हा वार्षिक योजना-२०१७-१८ नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत जलशुध्दीकरण यंत्र खरेदी खर्चास व यादीस मंजूरी प्रदान करणेबाबत.**

**ठराव :-** मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, गोंदिया यांचे प्रशासकिय मान्यता व निधी वितरण आदेश क्रं. ५२८/२०१८, दिनांक २८.३.२०१८ नुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१७-१८ नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत गोंदिया जिल्हयातील ३६ जिल्हा परिषद शाळांच्या यादीसह जलशुध्दीकरण यंत्र बसविण्यासाठी रु. ९०.०० लक्ष मंजूर करण्यांत आले आहे. मंजूर शाळांची यादी सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्यांत आली व जलशुध्दीकरण यंत्र बसविण्यासाठी मंजूर शाळांच्या यादीसह रु. ९०.०० लक्ष च्या खर्चास मंजूरी प्रदान करणेबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी विनंती केली.

त्यावर आजच्या सभेमध्ये चर्चा होवून जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१७-१८ नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत गोंदिया जिल्हयातील ३६ जिल्हा परिषद शाळांमध्ये जलशुध्दीकरण यंत्र बसविणे करीता रु. ९०.०० लक्ष च्या खर्चास मंजुरी प्रदान करण्यांत येत आहे. व यादीमध्ये फेरबदल करावयाचे असल्यास शिक्षण समितीची मंजूरी प्रदान करुन नियोजन विभागाला पुढील मंजूरीस्तव सादर करण्याबाबत सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/४ :- अनाधिकृत शाळा बाबत गावपातळीवर प्रेसनोट काढणेबाबत.**

**ठराव :-** राज्यामध्ये अनाधिकृत शाळा सुरु राहत असल्याचे संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या निदर्शनास आले आहे. अनाधिकृत शाळा सुरु राहिल्यास तेथील कर्मचारी, विद्यार्थी व पालकांची फसवणूक होण्याची होण्यास मोठया प्रमाणात वाव आहे. महाराष्ट्र शासन अथवा स्थानिक प्राधिकरणाच्या परवानगी/ मान्यता प्रमाणपत्राशिवाय शाळा चालविण्यांत येत असेल अशा शाळांवर रु. १ लाखापर्यंत दंडाची रक्कम व त्यांनतरही शाळा अनधिकृतरित्या चालु राहील्यास रु. १० हजार प्रति दिवस प्रमाणे दंड आकारण्याची तरतुद अधिनियमात करण्यांत आलेली आहे. तसेच शासन परवानगी/ मान्यता प्रमाणपत्राशिवाय अनाधिकृतरित्या सुरु असणा-या शाळांविरुध्द फौजदारी कार्यवाही करण्याच्या देखील शासनाच्या सूचना आहेत.

त्यामूळे आजच्या सभेमध्ये चर्चा होवून गोंदिया जिल्हयात सुध्दा अनाधिकृत शाळा चालवित असल्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता तालुका पातळीवर गट शिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख यांनी वेळोवेळी तपासणी करण्यांत यावे. जर तपासणी मध्ये शासनाकडून कोणतीही परवानगी नसतांना अनाधिकृत रित्या शाळा चालविण्यांत येत असल्याचे निदर्शनास आल्यास याबाबतचा अहवाल तात्काळ करण्यांत यावे व याबाबत गावपातळीवर माहिती होण्यासाठी प्रेसनोट काढण्याबाबत सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/५ :- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, राका, पं. स. सडक अर्जुनी येथील छत कोसळले असल्याबाबत.**

**ठराव :-** जिल्हा परिषद परिषद प्राथमिक शाळा, राका, पं.स. सडक अर्जुनी येथील जुन्या असलेल्या इमारतीतील वर्गखोलीचा छत नैसर्गिक आपत्तीने/ वादळी वा-यामूळे कोसळले आहे. त्यामूळे वर्गखोल्या अभावी मुलांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे सन्मा. सदस्या सौ. माधुरीताई पातोडे यांनी निदर्शनास आणून दिले.

त्यावर आजच्या सभेमध्ये चर्चा होवून वर्गखोली बांधकाम/ दुरुस्ती करीता इतर कोणत्याही योजनेमध्ये निधी उपलब्ध नसल्याने भविष्यात जिल्हा वार्षिक योजनेमध्ये अंत्यत प्राधान्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, राका, पं. स. सडक अर्जुनी येथील बांधकाम/ दुरुस्ती करीता प्रस्तावीत करण्यात येईल असे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/६ :- वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी विद्यार्थ्यांना उघडावयाच्या बॅक खातेवर रु. १०००/- अनिवार्य ठेवणे ही अट शिथिल करणेबाबत.**

**ठराव :-** शासन परिपत्रकानुसार जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत शाळांमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांना वैयक्तिक लाभाच्या योजनेचे अनुदान थेट त्यांच्या बॅक खात्यावर जमा करण्याबाबत निर्देश आहेत. त्यानुसार जिल्हा जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत शिक्षण घेणा-या योजनेनिहाय पात्र विद्यार्थ्यांना अनुदान विद्यार्थ्यांच्या बॅक खात्यावर जमा करण्यांत येते. पंरतू नियमानुसार बॅकेच्या खात्यावर किमान रुपये १०००/- जमा ठेवणे अनिवार्य असल्याचे बॅक व्यवस्थापकाकडून सूचना आहेत. सदर अनुदान शैक्षणिक दृष्टया विद्यार्थ्यांना आवश्यक असल्याने बॅकेने सदर अट शिथिल करावी याबाबत बॅकांना विनंती करावी असे सन्मा. सभापती महोदयांनी सूचविले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/७ :- जिल्हा परिषद हॉयस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, काटी येथे विज्ञान शिक्षकाची नियुक्ती करणेबाबत.**

**ठराव :-** जिल्हा परिषद हॉयस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, काटी, तालुका गोंदिया येथे विज्ञान विषयाच्या शिक्षकाचे पद रिक्त असून विद्यार्थ्यांना शैक्षणिक दृष्टया नुकसान होत असल्याने तातडीने विज्ञान विषयाच्या शिक्षकाची नियुक्ती करावी असे सन्मा. सदस्या सौ. रजनीताई गौतम यांची सूचविले.

त्यावर आजच्या सभेमध्ये चर्चा होवून जिल्हा परिषद हॉयस्कूल मधील विषयानुसार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही लवकरच करण्यांत येईल असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सांगितले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/८ :- जिल्हा परिषद हॉयस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेच्या तुकडीला मान्यता प्रदान करणेबाबत.**

**ठराव :-** जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत जिल्हा परिषद हॉयस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये इयत्ता ११ वी विज्ञान शाखेची तुकडी स्वयंअर्थशासित शाळा समिती आवश्यक बाबीवर खर्चाची पुर्तता करुन करारनामा केलेल्या जिल्हा परिषद हॉयस्कूल यांचे प्रस्ताव शिक्षण व क्रीडा समिती मध्ये मंजूरी प्रदान करुन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे मार्फत मा. शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना मंजूरीस्तव सादर करण्यांत आलेले आहे. पंरतू शासन स्तरावरुन अद्यापर्यंत मान्यता प्रदान करण्यात आलेली नसल्याचे सन्मा. सदस्या सौ. रजनीताई गौतम यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

त्यावर आजच्या सभेमध्ये चर्चा होवून शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, गोंदिया यांनी याबाबत विशेष लक्ष देवून शासन स्तरावरुन मान्यता प्रदान करण्यासाठी पाठपुरवा करावा असे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/९ :- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दांडेगांव येथील मुले व मुलीच्या शाळा एकत्र करण्याबाबत.**

**ठराव :-** जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा, दांडेगांव, पंचायत समिती, गोंदिया येथे मुले व मुलीच्या दोन स्वतंत्र शाळा सुरु आहेत. दोन्ही शाळांची पटसंख्या कमी झाल्यामूळे सदर दोन्ही शाळा एकत्र झाल्यास विद्यार्जन व इतर भौतिक सोई सुविधा करण्यास सोईचे होईल असे सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्यांत आले.

त्यावर आजच्या सभेमध्ये चर्चा होवून जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा, दांडेगांव, पंचायत समिती, गोंदिया येथील मुले व मुलीच्या दोन्ही शाळा एकत्र करण्याबाबत आवश्यक कागदपत्रासह संपूर्ण प्रस्ताव गट शिक्षणाधिकारी, गोंदिया यांनी सादर करावे व त्यानंतर मंजूरीची कार्यवाही पूर्ण करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/१०:- क्रीडा विकास योजनेंतर्गत मंजूर अनुदानाबाबत.**

**ठराव :-** जिल्हा क्रीडा अधिकारी, गोंदिया या कार्यालयामार्फत गोंदिया जिल्हयातील जिल्हा परिषद शाळांकरीता क्रीडा विकास योजनेंतर्गत अनुदान मंजूर करण्यांत येते. परंतु जिल्हा क्रीडा अधिकारी हे सभेला अनुपस्थित असल्यामूळे सदर योजने अंतर्गत कामाचा आढावा होत नसल्याने सन्मा. सदस्या सौ. माधुरीताई पातोडे यांनी नाराजी व्यक्त केली.

त्यावर आजच्या सभेमध्ये चर्चा होवून जिल्हा क्रीडा अधिकारी हे शिक्षण समितीच्या सभेमध्ये आवर्जुन उपस्थित राहून त्यांच्या विभागामार्फत जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत प्राथमिक शाळांमध्ये राबविण्यांत येत असलेल्या योजनांची विस्तृत माहितीसह उपस्थित राहण्याच्या सूचना निर्गमित करावे असे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/११:- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कनेरी येथे क्रिडा साहित्य अप्राप्त असल्याने चौकशी करण्याबाबत.**

**ठराव :-** जिल्हा क्रीडा विकास योजने अंतर्गत सन २०१६-१७ या वर्षात ज्या शाळांना आवारभिंत उपलब्ध आहेत अशा शाळांना क्रीडा साहित्य देण्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी मार्फत ठरविण्यात आले होते. यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कनेरी/राम, पं.स.सडक अर्जुनी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मलपुरी, पं.स. तिरोडा व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भुताईटोला, पं.स.गोरेगांव या शाळेचा समावेस होता. सदर शाळांना क्रीडा विभागार्फत क्रीडा साहित्य उपलब्ध करुन दयावयाचे होते. परंतू अद्यापर्यंत साहित्य अप्राप्त असून याबाबत चौकशी करण्यांत यावी असे सन्मा. सदस्या सौ. माधुरीताई पातोडे यांनी सूचविले.

याबाबत सदर विषयावर चर्चा करतांना जिल्हा क्रीडा अधिकारी, गोंदिया यांना पुढील बैठकीला सविस्तर अहवालासह उपस्थित राहण्याबाबत कळविण्यांत यावे असे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/१२:- जिल्हा परिषद हायस्कूल, सौदड येथे इयत्ता ११ वी विज्ञान शाखा मंजूरीबाबत.**

**ठराव :-** जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या उच्च माध्यमिक वर्गाला विज्ञान शाखा जोडण्याबाबतचे प्रस्ताव सदर शाळा व्यवस्थापन समितीकडून प्राप्त झालेले असून त्या ठिकाणी वर्ग सुरु करण्याबाबत गावक-यांची मागणी असल्यामूळे जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालय, सौदड, तालुका सडक अर्जुनी येथे विज्ञान शाखा सुरु करण्याबाबत सभागृहात मागणी केली.

त्यावर सभागृहात चर्चा होवून जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालय, सौदड येथे विज्ञान शाखा सुरु करण्याबाबतचे प्रस्ताव संबधीत शाळेचे मुख्याध्यापक व शाळा समिती यांचेकडून प्राप्त करुन घेवून स्वयंअर्थशासित शाळा समिती सदर वर्गाना शिकविणा-या शिक्षकांचे मानधन, वेतन व इतर आवश्यक बाबीवर खर्चाची पुर्तता करण्याबाबत रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा शासन निर्णयानुसार करुन दिल्यास अशा शाळेचे प्रस्ताव मा. शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना मंजूरीस्तव सादर करण्यांत यावे असे ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रं. ३/१३:- सन २०१७-१८ या सत्रातील बंगाली भाषेच्या पाठयपुस्तके खरेदी ची अखर्चित रक्कम सन २०१८-१९ या वर्षात खर्च करण्याची परवानगी मिळण्याबाबत.**

**ठराव :-** सन २०१७-१८ या सत्रात इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना बंगाली भाषेच्या पाठयपुस्तके खरेदी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या स्वतःच्या उत्पन्नाची साधने यातून दयावयाच्या योजना १०१-२१/१ या लेखाशिर्षकामध्ये रुपये १,५०,०००/- (रुपये एक लक्ष पन्नास हजार) चे अनुदान मंजूर होते. सदर अनुदान पंचायत समिती, अर्जुनी मोरगांव यांना वित्तप्रेषणाद्वारे वितरीत करण्यांत आले आहे. परंतू सन २०१७-१८ मध्ये बंगाली पाठयपुस्तके खरेदी करीता एकूण रक्कम रुपये ७५,६४२/- (रुपये पंच्यात्तर हजार सहाशे बेचाळीस) खर्च झाले असून उर्वरित रक्कम रुपये ७४,३५८/- शिल्लक असल्याने सदरील अखर्चित रक्कम सन २०१८-१९ या वर्षात खर्च करण्याची परवानगी मिळण्याबाबत गट शिक्षणाधिकारी, अर्जुनी मोरगांव यांनी विनंती केली.

त्यावर आजच्या सभेमध्ये चर्चा होवून सन २०१७-१८ या सत्रात पंचायत समिती अर्जुनी मोरगांव यांना इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना बंगाली भाषेच्या पाठयपुस्तके खरेदी करण्यासाठी लेखाशिर्ष १०१-२१/१ मध्ये रुपये १,५०,०००/- वितरीत करण्यांत आलेल्या अनुदापैकी अखर्चित रक्कम रुपये ७४,३५८/- सन २०१८-१९ या वर्षात खर्च करण्याची परवानगी अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यांत येत असल्याचे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. ०४ : शिक्षण व क्रिडा समिती सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करणे.**

**ठराव क्र. ०४: शिक्षण व क्रिडा समिती सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करण्यात आले.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

यानंतर सभागृहासमोर विषय नसल्यामुळे सर्व सन्मा. सभापती, सन्मा. सर्व सदस्य यांनी आजच्या सभेला उपस्थित राहुन आजच्या सभेचे कामकाज चालविण्यास सहकार्य केले त्या बद्दल श्री उल्हास के. नरड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी उपस्थित सर्वाचे आभार व्यक्त केले व मा. अध्यक्षाच्या परवानगीने आजची सभा संपल्याचे जाहिर केले.

**स्वा/-**
सचिव,तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, गोंदिया.

**स्वा/-**
अध्यक्ष
शिक्षण व क्रिडा समिती,
जिल्हा परिषद, गोंदिया.